दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३५३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१८ मार्च २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल महानगरपालिकेच्या आकृतिबंधाला मंजुरी

## कर्मचारी भरतीच्या प्रक्रियेला येणार गती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालिकेच्या स्थापनेपासून प्रशासकीय घडी व्यवस्थित बसविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा आकृतिबंधाला शासनाने मंजुरी दिली आहे. नगरविकास विभागाचे उपसचिव शंकर जाधव यांच्या सहीने हे अध्यादेश काढण्यात आले आहे.

१ ऑक्टोबर, २०१६ रोजी स्थापन झालेली पनवेल महानगरपालकेची लोकसंख्या १० लाखांच्या आसपास असून, तरंगती लोकसंख्या १३ लाख एवढी आहे. यामध्ये सुमारे साडेतीन लाख मालमत्ताधारक आहेत. या आकृतिबंधात पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायतीचे २८८, नगरपालिका अस्तित्वात असलेल्या ३९२ व ६५० वाढीव पदास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ (४) नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या कार्यकाळात पनवेल महानगरपालिकेचे आकृतीबंधाचे काम पूर्ण करण्यात आले होते. त्याचा शासनदरबारी यशस्वी पाठपुरावा करून, आयुक्त सुधाकर देशमुख यांनी आकृतिबंधाचा विषय मार्गी लावला आहे. नव्याने मंजूर पदे भरल्याने अतिशय कमी मनुष्यबळावर सुरू असलेला पनवेल महानगरपालिकेचा प्रशासकीय गाढा गती घेणार आहे.

सध्या नगरपरिषदेत लिपिक पदे भूषविलेले कर्मचारी प्रभाग अधिकारी पदाचा कारभार पाहत आहेत. या व्यतिरिक्त इतर विभागात नेमलेल्या पदाचा अनुभव नसलेले कर्मचारी व अधिकारी काम करीत असल्याने, याचाच परिणाम पालिकेच्या कामकाजावर होत आहे. मागील चार वर्षांपासून प्रभाग सभापती नामधारी ठरले असल्याने, या सर्व कचाट्यातून पालिका प्रशासनाची मुक्तता होणार आहे. पालिका क्षेत्राची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, तसेच पनवेल शहराचे ऐतिहासिक महत्त्व व दळणवळणाच्या दृष्टीने भविष्यातील महत्त्व विचारात घेता, केंद्र व राज्य



शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी, त्याचप्रमाणे प्रशासकीय कामकाज करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता, नवीन पदांची निर्मिती करण्याची गरज लक्षात घेता, शासनाने या आकृतिबंधाला मंजुरी दिली आहे.

या मंजूर आकृतिबंधात वर्ग १ ची २७ पदे आहेत. यामध्ये आयुक्तांसह, १ अतिरिक्त आयुक्त, १ शहर अभियंता, नगररचना विभागात १ उपसंचालक, २ कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सहायक संचालक (नगररचना), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, परिवहन व्यवस्थापक, २ उपायुक्त, उपअभियंता, ५ उपअभियंता (स्थापत्य) यासह मुख्य लेखाधिकारी, अग्निशमन अधिकारी, नगररचनाकार या महत्त्वाच्या पदांचा समावेश आहे. आकृतिबंधाच्या मंजुरीनंतर प्रत्येक मंजूर पदाचे सेवा निकष शासनाकडून पालिकेला प्राप्त होतील.

यानंतर, बिंदू नियमावली ठरली जाईल. यात मंजूर पदांच्या दृष्टीने आरक्षणाची चाचपणी केली जाईल. त्यानंतर, शासनकडून या पदांच्या भरतीसाठीची माहिती पोर्टलवर टाकली जाईल. त्यानंतर, मंजूर पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा होणार आहे. या सर्व प्रक्रियेला किमान सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

### शेतकऱ्यांच्या फसवणुकीचा सिडको विरोधात एल्गार....

# सिडकोच्या स्थापना दिवशीच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केला निषेध



**दै.रायगड नगरी । पनवेल/उरण**

१७ मार्च १९७० साली स्थापन झालेल्या सिडकोने गेल्या ५१ वर्षात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची केवळ फसवणूक केली असून वेळी रक्तपात करूनही न्याय मिळत नसल्यामुळे आज १७ मार्च रोजी सिडकोच्या स्थापना दिवसानिमित्त ९५ गाव प्रकल्पग्रस्त समितीमार्फत काळा दिवस साजरा करून सिडकोचा निषेध करण्यात आला. यावेळी कळंबोली येथील नगरसेवक रविंद्र भगत, प्रकल्पग्रस्त समितीचे ॲड. सुरेश ठाकूर, ॲड. विजय गडगे यांनी विविध ठिकाणी निदर्शने करून निषेध नोंदविला. आज सिडको विरोधात प्रकल्पग्रस्तांच्या भावनांचा मोठ्या प्रमाणात उद्रेक झाल्याचे चित्र पहावयास मिळत होते. सिडको विरोधात नवी मुंबई, ठाणे, पनवेल व उरण परिसरातील प्रकल्पग्रस्तांनी बॅनरबाजी करून आपला निषेध व्यक्त केला.

१७ मार्च २०२१ रोजी सिडकोच्या स्थापनेस ५१ वर्ष होत असून हा दिवस प्रकल्पग्रस्तांच्या आयुष्यातील काळा दिवस मानून ..../२

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. परंतु आज मात्र प्रश्न पड़लेला आहे की, भारत नक्की स्वतंत्र झालेला आहे का? कारण आज ही भूसंपादन करिता १८९४, क्राइमसाठी सीआरपीसी किंवा सीपीसी साठी ब्रिटीश काळीन कायद्याचा वापर केला जातो. ब्रिटीशानी शेतकऱ्यांकडुन कर स्वरूपात रक्कम अगर धान घेतले जात असे म्हणजेच ब्रिटिशाने भारतावर १५० वर्ष राज्य करून कोणत्याही शेतकऱ्याला शेतीपासुन अलिप्त केले नाही. मात्र जे १५० वर्षात ब्रिटिशांना नाही जमले ते भारतीय राजकीय लोकांनी १९६९ साली करून दाखवले ते म्हणजे शेतकऱ्यांच्या ज़मीनीवरील कर अगर धारा सोडा देशाच्या विकासाच्या नावाने कवडी मोलाने ज़मीनी घेतल्या आणि आमचे ग़रीब शेतकऱ्यांनी देखील देशप्रेमापोटी मान्य ही केले. परंतु ज्या ज़मीनी शासनाने विकासाच्या नावाने संपादित क़ेल्या जात आहेत त्या संपादित ज़मीनी दुसऱ्या मार्ग़ाने भांडवलदारांच्या घश्यात घालत आहे. प्रश्न असा की, नक्की ईस्ट इंडिया भारतातून गेली का? सिडकोने ज़मीनी तर घेतल्याच आहेत आता पीआईएल ८०/२०१३ चा वापर करून पंजोबा, आजोबा पासुन अस्तित्वात असलेली घरे तोडून क्लस्टर आणू पाहत आहेत. त्यासाठी मूळ ग़ावठाण निश्चित करून मूळ ग़ावठाण बाहेरील ज़मीन घेऊ पाहत आहे. अश्या सिडकोचा धिक्कार आहे. अश्या सिडकोचा आज वर्धापन दिन म्हणजेच शेतकऱ्यांचा काळा दिवसच आहे.

**ॲड. विजय गडगे ९५ ग़ाव नवी मुंबई, नैना व इतर प्रकल्पग्रस्त समिती (कार्याध्यक्ष)**

## संक्षिप्त...

### राज्यात आज कोरोनाच्या २३,१७९ नव्या रुग्णांची वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोनाचा कहर सुरू झाला असून आज निदान झालेल्या नव्या करोना बाधित रुग्णांचा आकडा राज्याची स्थिती अधिक चिंताजनक झाल्याचे अधोरेखित करणारा आहे. गेल्या काही दिवसांपासून करोना बाधितांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठी वाढ होत असून आजचा आकडा पाहिल्यास करोनाने राज्यात मोठी उसळी मारल्याचे स्पष्ट होत आहे. आज गेल्या २४ तासांत राज्यात २३ हजार १७९ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. काल ही संख्या १७ हजार ८६४ इतकी होती. कालच्या तुलनेत ही वाढ ५ हजार ३१५ ने अधिक आहे. या बरोबरच, गेल्या २४ तासांमध्ये एकूण ९ हजार १३८ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. याबरोबरच राज्यातील सक्रिय रुग्णांची संख्या १ लाख ५२ हजार ७६० वर जाऊन पोहचली आहे. आज राज्यात एकूण ८४ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर २.२४ टक्के इतका आहे. राज्यात आज ९ हजार १३८ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, तर आतापर्यंत एकूण २१ लाख ६३ हजार ३९१ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९१.२६ टक्के इतके झाले आहे.

# हेमंत नगराळे नवे मुंबई पोलिस आयुक्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याच्या पोलिस दलात मोठे फेरबदल करण्यात आले असून मुंबईचे पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांची आयुक्तपदावरून हटवण्यात आले आहे. सिंग यांच्या जागी राज्याचे पोलिस महासंचालक हेमंत नगराळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही घोषणा राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली आहे. पोलिस आयुक्त असलेले परमबीरसिंग यांची उचलबांगडी होणार अशी जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून ऐकू येत होती. परमबीर सिंग यांना होमगार्ड म्हणजेच गृहरक्षक दलाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



या बरोबरच रजनीश शेठ यांच्याकडे राज्याच्या पोलिस पोलिस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. तर, संजय पांडे यांच्याकडे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची दबाबदारी देण्यात आली आहे. मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी नियुक्ती झालेले हेमंत नगराळे हे सन १९८७ च्या बॅचचे खझड अधिकारी आहेत. हेमंत नगराळे यांनी२०१६ मध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्त पदावर काम केले आहे. पुढे दोन वर्षांनी, सन २०१८ मध्ये त्यांची नागपूरला बदली करण्यात आली होती. मुंबई पोलिस आयुक्तपदी नियुक्ती होत असाना नगराळे पोलिस महासंचालक (विधी आणि तंत्रज्ञान) म्हणून काम करत होते. हेमंत नगराळे यांचा १ वर्षे ७ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे.

# भ्रष्टाचारातून अवैध संपत्ती जमविलेल्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्याची रास्त धान्य दुकाने, केमिकल कंपन्या, भोजन केंद्रे आणि जिल्ह्यातील गोडाऊन त्याचबरोबर वाहतूक ठेकेदार यांच्याकडून विविध कारवाईचा धाक दाखवून अमाप संपत्ती जमा केली आहे. त्यांना मिळणारे वेतन व त्या काळची संपत्ती याचा मेळ जुळवल्यास व बारकाईने चौकशी केल्यास मोठे घबाड लाचलुचपत खात्याच्या हाती लागेल. त्यामुळे त्यांची लाचलुचपत खात्याकडून बारकाईने चौकशी व्हावी अशी मागणी रायगड जिल्ह्यामधून केली जात आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी हे भाजप सरकारच्या काळात रायगड जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून रुजू झालेले आहेत. त्यांनी गेल्या दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीत अमाप संपत्ती जमा केली आहे.

रायगडमध्ये मोक्याच्या ठिकाणी काही जागा व नव्या मुंबईत काही सदनिका खरेदी केलेल्या असल्याचे बोलले




जात आहे. त्यामुळे त्यांची लाचलुचपत खात्याने बारकाईने चौकशी केल्यास मोठे घबाड हाती लागण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे त्यांची तातडीने चौकशी करावी अशी मागणी रायगड वासियांमधून केली जात आहे.

# सिडको महामंडळाचा ५१ वा वर्धापन दिन साधेपणाने साजरा

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या स्थापनेस आज दिनांक १७ मार्च २०२१ रोजी ५१ गौरवशाली वर्षे यशस्वीरित्या पूर्ण झाली असून कोविड – १९ च्या पार्श्वभूमीवर सिडकोचा वर्धापन दिन साधेपणाने साजरा करण्यात आला. सिडकोची आजवरची यशस्वी कारकीर्द व सिडकोतर्फे यशस्वीरित्या हाताळण्यात आलेले आंतरराष्ट्रीय दर्जाचे विविध प्रकल्प यातूनच सिडकोचे नगरविकास क्षेत्रातील अतुल्य योगदान दिसून येते.



सिडकोच्या नगरविकासातील योगदानामुळे सिडकोचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर आदराने घेतले जाते. सिडकोने अनेक महत्वाकांक्षी तसेच लोकोपयोगी प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करत जनमानसात विश्वास संपादन केला आहे. सर्वांगीण प्रगती हेच आता सिडकोचे ध्येय असून महत्वाकांक्षी प्रकल्पांच्या अंमलबजावणीसोबतच सर्वसामान्यांचा विकास हेच सिडकोचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे मत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी व्यक्त केले.

# पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक संजय भोपी यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भाजपचे नगरसेवक तथा माजी प्रभाग समिती सभापती संजय भोपी यांची जीवनाबरोबरची लढाई अखेर संपली. भोपी गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार घेत होते. शेवटी बुधवारी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी प्रेमा भोपी आणि मुलगा अभिषेक त्याच बरोबर इतर कुटुंबीय आहेत. त्यांच्या निधनाने खांदा वसाहतीवर शोककळा पसरली. त्याचबरोबर भाजपमध्ये आणि स्थानिक पातळीवरील राजकारण आणि समाजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या संजय भोपी यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात संघर्ष केला. रियल इस्टेटमध्ये त्यांनी जम बसवला. युवा उद्योजक म्हणून ते पुढे आले. पनवेल नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांनी पदार्पण केले पण त्यांना अपयश आले त्यानंतर संजय भोपी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. त्यांना प्रभाग १५ मध्ये पक्षाने उमेदवारी सुद्धा दिली. आणि ते निवडून सुद्धा आले. लागलीच त्यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर प्रभाग समिती ब चे सभापतिपद सुद्धा त्यांना देण्यात आले. एक सर्वसामान्य कार्यकर्ता ते प्रभाग समिती सभापती असा त्यांचा प्रवास राहिला. संजय भोपी सोशल क्लब, अलर्ट सिटीझन फोरम, मॉर्निंग योगा ग्रुप या संस्थांमध्ये ते सक्रिय होते. ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी ते कायम धावून जात असत. सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत तत्पर असलेले कार्यक्षम नगरसेवक म्हणून त्यांची एक वेगळी ओळख होती. खांदा वसाहतीतील प्रश्न आणि समस्यांची सोडवणूक करण्यासाठी ते कायम पाठपुरावा करत असत. मितभाषीक, संवेदनशील, प्रेमळ आणि मनमिळावू असे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य होते. दांडगा जनसंपर्क, मोठा मित्रपरिवार त्यांच्याकडे होता. अज्ञात शत्रू म्हणून त्यांची पनवेलच्या राजकारणामध्ये ओळख होती. दरम्यान कोरोनाच्या काळात त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी मधून प्रभावी काम केले. गोरगरीब गरजूंना मदतीचा हात दिला. हे करत असताना त्यांना कोरोनाविषाणूचा संसर्ग झाला. संजय भोपी यांना उपचारासाठी अपोलो हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. त्याठिकाणी प्रकृती सुद्धा सुधारणा झाली. परंतु त्यानंतर पुन्हा प्रकृती खालावली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः लक्ष घालून त्यांना उपचारासाठी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल केले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची आपल्या जीवनाबरोबर लढाई सुरु होती. अखेर बुधवारी या लढवय्या लोकप्रतिनिधी प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी शोक व्यक्त केला आहे.

# रोह्यात कपड्याच्या दुकानाला आग ; लाखोंचे नुकसान

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहयात मध्यरात्री कपड्याच्या दुकानाला आग लागून आगीच्या वेळख्यात सापडलेले दुकान अक्षरशः जळून खाक झाले. धाटाव येथील अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी जाऊन आग विझविल्याने पुढील अनर्थ टळला असल्याचे समोर आले.



रोहा अष्टमी नगर परिषदे समोरील नाकोडा कॉम्प्लेक्स मधे बँक ऑफ इंडिया एटीएमच्या शेजारी असलेल्या भूमिका कलेक्शन या कपड्याच्या दुकानाला पहाटे ४:३० वा. दरम्यान आग लागली.

नगर परिषदेचा पाणी पुरवठा करणार्या कर्मचार्याने प्रथम दर्शी आग पहाताच त्याने संबंधितांना संपर्क केला. यानंतर ..../२

**REQUIRED**
Civil engineer / Supervisor
With Min 5 Years Experience
Office Add : 1204, The Affaires, Plot no.9
Sec 17, Sanpada Navi Mumbai
Email Id : simranenpt@yahoo.com
Call : 022 - 27811295

# महावितरणच्या कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरणी ग्रामपंचायत सदस्याला अटक

**दै.रायगड नगरी । अनंत नारंगीकर**

**जेएनपीटी** : महावितरणच्या उरण उपविभागीय कार्यालय हद्दीतील चिरनेर– भोम येथिल नकुल पाटील यांचे थकित वीज बील न भरल्यामुळे वीज तोडली असता नकुल त्यांच्या ग्रामपंचायत सदस्य असलेल्या तुषार पाटील या मुलाने महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी तुषार पाटील यांच्यावर उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने वीज थकबाकी धारकांना बील भरण्यात सवलत देण्यास नकार दिल्यानंतर महावितरणचे कर्मचारी थकबाकीदारांचे वीज जोडण्या तोडण्यास सुरूवात केली आहे. सोमवारी अशीच कारवाई करण्यासाठी वीज कर्मचारी गेले ..../२

# संस्कृतीच्या नावानं...

महाराष्ट्राची वर्तमान स्थिती पाहिली, तर या राज्याला 'सांस्कृतिक धोरण'च नाही, हे वरदानच आहे, असेच कोणत्याही सुसंस्कृत आणि विचारी माणसाला वाटेल. इतिहासाच्या अनाहत प्रवाहात डाग व कलंक पुसून जात असतात आणि त्या त्या प्रदेशातल्या मातीत रुजलेली व उमलून येणारी चिरंतन मूल्ये उज्वल कांतीने चमकत राहतात. त्या प्रदेशातील समाज हा त्या मूल्यांचा जाणता-अजाणता वाहक असतो आणि तो त्या मूल्यांचा परिष्कृत आविष्कारही घडवत राहतो. संचितात नवी मूल्ये जोडत राहतो. या मूल्यांच्या आणि जगण्याच्या आविष्काराची माध्यमे भाषा, कला, चित्र, नृत्य, नाट्य, चित्रपट अशी अनेक असतात. हे सारे एका विशिष्ट पद्धतीने करणारा एकजिनसी समाज असतो. ती त्याची अनन्य ओळख असते आणि त्याचे व्यक्तिमत्वही. हे सारे मिळून त्या त्या समाजाची संस्कृती बनत असते; पण ती टिकतेच असे नाही. जगावर नजर टाकली, तर ते समजेल. ज्यांना ती टिकावी असे वाटते, ते त्यासाठी प्रयत्न करतात. हिब्रू भाषेच्या जतनाचे उदाहरण येथे अप्रस्तुत ठरू नये.सांस्कृतिक धोरण हे अशा प्रयत्नांची एक दिशा सांगते. सांस्कृतिक धोरण नसले, तरी संस्कृतीचा महानद वाहात असतोच; पण ज्यांच्या हातात सत्ता, साधने आणि इतर अनुकूलता असूनही संस्कृतीचे देणेच द्यावेसे वाटत नाही, त्यांच्यासारखे करंटे तेच असतील. आजच्या महाराष्ट्राला ना सांस्कृतिक धोरण आहे; ना भाषा धोरण. एक मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र जन्माला आला, याचे एकमेव कारण 'आमची स्वतंत्र ओळख व स्वप्ने आहेत' असे जगाला सांगायचे होते. प्रत्यक्षात महाराष्ट्रातील साहित्य, आहार व पाककला, संगीत, नाटक, चित्रकला, क्रीडा, शिल्पकला, चित्रपट, नृत्य या साऱ्यांचा प्रवास कसा व्हावा आणि त्यासाठी समाज व सरकार काय करू इच्छिते, याचा कोणताही आराखडा आज आमच्याकडे नाही. महाराष्ट्राच्या स्थापनेला पन्नास वर्षे झाली, तेव्हा सत्ताधाऱ्यांना अचानक याची आठवण झाली. समिती नेमली गेली. आता महाराष्ट्राच्या स्थापनेचा हीरक महोत्सव झाला. पहिल्या समितीनंतर ११ वर्षांनी सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांनी नव्याने सांस्कृतिक धोरण ठरविण्यासाठी नव्याने समिती नेमण्याची घोषणा केली आहे. या समितीने विशिष्ट काळात आपला अहवाल द्यावा आणि आधीच्या प्रस्तावात कालोचित सुधारणा करावी, अशीही अपेक्षा आहे. आज एकविसाव्या शतकाची दोन दशके ओलांडली असताना महाराष्ट्र, मऱ्हाटी संस्कृती आणि मराठी भाषा यांचा विचार केवळ ३६ जिल्ह्यांपुरता करता येणार नाही. जुन्या बृहन्महाराष्ट्राचा विचार तर करावा लागेलच; पण आज विविध निमित्ताने देशभरात वसलेला मराठी माणूस व त्याच्या सांस्कृतिक धाग्यांचाही विचार करावा लागेल. इतकेच नाही, तर आज पृथ्वीच्या पाठीवर शंभराहून अधिक देशांमध्ये वसलेल्या मराठी माणसाचे मराठी संस्कृतीशी असणारे नाते कसे जोडता, टिकवता, वर्धिष्णू करता येईल, हेही लक्षात ठेवावे लागेल. जागतिकीकरणाचा रेटा आल्यानंतर जगभरात संस्कृतींचे सपाटीकरण होत आहे आणि आपणही त्यात सापडत आहोत. कोणत्याही शहरात गेल्यानंतर तिथल्या प्रमुख रस्त्यांचा दिसणारा समान तोंडवळा व तिथले समुदाय हे या सपाटीकरणाचे केवळ एक छोटेसे दृश्य उदाहरण आहे. याशिवाय, अगदी आहाराच्या सवयींपासून अनेक पातळीवर हे सपाटीकरण होत असते. अशा वेळी, मराठी माणूस, महाराष्ट्र राज्य आणि जगभरातील मराठी समाज यांची समन्वित ओळख काय आहे, कशी असायला हवी आणि ती पुढच्या शतकांमध्ये टिकवून ठेवण्यासाठी काय करायला हवे, याचे दिशादिग्दर्शन सांस्कृतिक धोरणामधून होणे अपेक्षित असते; पण ज्या राज्यांमध्ये भाषा, शिक्षण, सांस्कृतिक ही खातीच मुळात कमी महत्त्वाची मानली जातात, तेथे सांस्कृतिक धोरणाला महत्त्व कसे मिळणार? भारतात महाराष्ट्राचे भौगोलिक व सांस्कृतिक स्थान अनन्य आहे. तो सर्वच अर्थांनी उत्तर व दक्षिण यांना जोडणारा 'कॉरिडॉर' आहे. अशा वेळी, गेल्या काही हजार वर्षांमध्ये विकसित होत गेलेल्या 'महाराष्ट्री' संस्कृतीचे जतन व संवर्धन केले नाही, तर आपण केवळ इतर समाज व त्यांच्या आविष्कारांच्या 'कॉप्या' मारत बसू. नीट पाहिले, तर अनेक क्षेत्रांमध्ये आज ते दिसेल. तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे सांस्कृतिक आक्रमणांचा जसा धोका आहे; तसेच ही माध्यमे कल्पकतेने वापरली, तर आपली संस्कृती जपण्याचे नवनवे सर्जनशील मार्गही दिसू लागतील. समाज व समाजातील संस्था आपापल्या परीने हे सारे करीत असले, तरी त्यांना राज्यकर्त्यांनी दृष्टी द्यायची असते. तसे नसते, तर छत्रपती शिवरायांनी मराठीतला 'राज्यव्यवहार कोश' आग्रहाने कशासाठी लिहवून घेतला असता? मात्र, करायचे काहीच नाही आणि नुसते गळे काढायचे, ही आपली आजची वर्तनसंस्कृती झाली आहे. ती महाराष्ट्राच्या इतिहासाशी नाते सांगणारी नाही.

# सण -उत्सवात नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल : अनिल विभूते

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पुन्हा एकदा कोरोना विषाणूने डोके वर काढल्याने कोरोनावर नियंत्रण आणण्यासाठी शासन स्तरावरून कडक नियम लावण्यात येत असून सण - उत्सवाच्या काळात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कडक नियमावली लावण्यात आली आहे. तर खालापूर तालुक्यात कोरोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली असून होळी - धुलवड - शिवजयंती पाश्वभूमीवर खालापुर पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक अनिल विभूते यांनी खालापूर तालुक्यातील पोलिस पाटील यांची १५ मार्च रोजी बैठक घेत नियम व अटी सांगून जर कोणीही या उत्सव काळात शासनाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई करीत गुन्हा दाखल करण्यात येईल, त्यामुळे सर्वानी शासनाच्या नियमाचे पालन करून कोरोना रोखण्यात यश मिळावा असे मत निरिक्षक विभूते यांनी व्यक्त केले.

खालापूर तालुक्यात सर्व धर्माचे नागरिक राहत असून सर्व जण एकमेकांच्या सण - उत्सवात सहभाग घेत अनेक उत्सवाचा आनंद लुटत असून गेल्या वर्षभरापासून कोरोना महाभयंकर विषाणूने विळखा घातल्याने अनेकांना सण - उत्सवाचा मोठ्या प्रमाणात आनंद घेता आला नाही. मध्यतंरी कोरोनावर नियंत्रण मिळवण्यात सर्वाना यश मिळाल्याने अनेक सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले असता पुन्हा एकदा कोरोनाने डोके वर काढल्याने शासकीय यंत्रणा सतर्क झाली असून कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कडक नियमावली लावली असल्याने खालापूर तालुक्यातील प्रशासनाने कडक भूमिका घेत आगामी दिवसात साजरे होणारे सण - उत्सवावर नियम लावले असल्याने खालापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक अनिल विभूते यांनी १५ फेब्रुवारी रोजी खालापूर तालुक्यातील पोलिस पाटीलांची बैठक घेऊन कशा प्रकारे होळी - धुळवड - शिवजयंती उत्सव नागरिकांनी साजरी करावे यांचे मार्गदर्शन केले असून यावेळी पोलिस पाटील यांचे मत जाणून घेत त्याच्या समस्यांचे निराकारण केले. तर पुढे बोलताना पोलिस निरिक्षक विभूते म्हणाले की, उत्सव साजरा करताना प्रत्येक प्रत्येकाची काळजी घेऊन कोरोनाचा प्रादुर्भाव कसा रोखता येईल यावर भर दया. आतापर्यत कोरोनाची मोठी लढाई आपण मोठ्या चोखमीने पार पाडली तशीच लढाई पुढील काळात पाडून कोरोनावर यशस्वीरित्या मात करुया जेणेकरुन कोरोनाचा नायनाट करु. जर कोणी शासनाच्या नियमाचे उल्लंघन केल्यास त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल. तसेच पोलिस पाटील यांनी गावात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची माहिती आम्हाला वेळोवेळी देत रहा असे मत विभुते यांनी व्यक्त करित सर्वानी आगामी दिवसात साजरे होणारे सण - उत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

या बैठकीच्या वेळी सर्व धार्मिक उत्सव गुण्यागोविंदाने अत्यंत संयमाने सगळे सण साजरे करावे असा एकच सूर सर्वांचे तोंडुन निघाला. तर याप्रसंगी पोलिस निरिक्षक अनिल विभूते, पोलिस अधिकारी संजय बांगर, अंबिका अंधारे, गायत्री जाधव यांच्या मोठ्या संख्येने पोलिस पाटील उपस्थित होते.



# रोह्यातील अनधिकृत कामांविरोधात शिवसेना उग्र आंदोलन करणार : समीर शेडगे

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा अष्टमी नगरपरिषदेत गेल्या पाच वर्षात भरपूर कामे मंजूर झाली मात्र ही कामे करत असताना अनधिकृतपणे केली असल्याचा आरोप रोहा तालुका शिवसेना तालुका प्रमूख समीर शेडगे यांनी केला आहे. रोह्यातील या अनधिकृत कामांविरोधात शिवसेना उग्र आंदोलन करणार असे मत रोहा तालुका प्रमूख समीर शेडगे यांनी व्यक्त केले.

बुधवारी सकाळी रोहा शासकीय विश्राम गृहात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी नगरसेविका समीक्षा बामणे, माजी नगरसेवक दिपक तेंडुलकर, उस्मान रोहेकर, राजेश काफरे, आदित्य कोंडाळकर, विभाग प्रमूख संदीप सुतार, निता हजारे उपस्थीत होते. पुढे बोलताना ते पुढे म्हणाले की, रोहयात झालेल्या कामांपैकी भुयारी गटाराच्या योजनेचे ३६ कोटी रुपये फुकट गेले, नदीसंवर्धंन काम अपूर्ण असल्याने कम्पलेशन सर्टिफिकेट नसतानाही लोकार्पंन करुन नागरिकांकडून तिकीट वसूल करण्याचे काम केले जात आहे. नैसर्गिक गटारांवर अनधिकृतपणे स्लॅब टाकण्यात आले आहेत. विमलाबाई मेहंदळे हायस्कूल मुलींच्या शाळेच्या ठिकाणी खाजगी संस्थेला इंग्रजी माध्यमिक शाळा भाडेतत्वावर चालविण्यासाठी इमारत दिली. असे करायचे होते तर भाडेतत्वावर देण्याआधी नगरपालिकेने ४ ते ५ लाख रुपये डागडुजीसाठी खर्च का केले? असा सवाल केला. याबाबत शिवसेनेच्या नगरसेविका समीक्षा बामणे यांनी नगरपरिषदच्या सभेत आवाज उठविला असता त्यांच्या विरोधात अनधिकृत कामे केल्याच्या आरोपावरून त्यांना नगरसेवक पद-ावरुन खाली करण्याचा राजकीय कट करण्यात आला. भुयारी गटार योजनेत सरकारचे ३६ कोटी रुपये फुकट गेले असल्याचे त्यांनी सांगितले. भुयारी गटाराचे काम अर्धवट ठेवल्याने वाढत्या लोकसंख्येमुळे पुढच्या पिढीला याचा त्रास सहन करावा लागणार आहे. नदीसंवर्धनाचे काम अपूर्ण असताना लोकार्पण करण्यात आले असून कामही अपूर्ण ठेवण्यात आले असल्याने शासनाची फसवणूक करण्यात आली आहे. आगामी काळात रोहा अष्टमी नगरपरिषदेची निवडणूक शिवसेना स्वबळावर लढणार असल्याचे मत तालुका प्रमूख समीर शेडगे यांनी व्यक्त केले. याशिवाय राष्ट्रवादी वगळून मित्रपक्षाचे मत विचारात घेणार असल्याचे सांगितले. केवळ स्थानिकांच्या प्रश्न सोडविण्यासाठी लोक निवडून देतील असे शेवटी म्हणाले. पत्रकार परिषदेत उस्मान रोहेकर, समीक्षा बामणे व दीपक तेंडुलकर यांनी रोहा शहरात होणा-या अनधिकृत कामांविषयी आपले मत व्यक्त केले.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**




# उरण पंचायत समितीत अपंगांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण पंचायत समितीच्या गलथान व मनमानी कारभारामुळे गेले अनेक वर्षे समाज कल्याण विभागाचे अपंग सहाय्य टेबल पहिल्या माळ्यावर असल्यामुळे उरण मधील अपंगांची गैरसोय होत आहे. पंचायत समिती अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभारा बाबत अपंग बांधवांकडून तिव्र संताप व्यक्त केला जात आहे.

उरण पंचायत समितीच्या माध्यमातून उरणच्या जनतेला अनेक योजनांचा लाभ घेता यावा यासाठी तळमजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर अधिकाऱ्यांच्या माध्यमातून एकूण १५ पेक्षा जास्त टेबल्स वर काम चालू आहे.यामध्ये समाज कल्याण विभागाच्या अपंग साहाय्य योजनेचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा टेबल हा पहिल्या माळ्यावर आहे.उरण मध्ये अपंगांची संख्या ही १३७२ एवढी आहे यामधील साठ टक्क्यांपेक्षा जास्त अपंग हे पन्नास टक्के अपंग आहेत.मात्र पंचायत समिती मधील अपंगांना लाभ देणार समाज कल्याण विभागाचा टेबल हा पहिल्या माळ्यावर असल्याने अपंग बांधवांना वर चढणे कठीण होत आहे. त्यामुळे अपंग बांधवांची गैरसोय होत आहे. ही समस्या अनेक वेळा अपंग बांधवांनी पंचायत समितीतिल वरीष्ठ अधिकाऱ्यांना तोंडी आणि लेखी निवेदनाद्वारे कळविले होते मात्र त्यांच्या या समस्येकडे अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे.मात्र त्यांची ही समस्या लक्षात घेता पहिल्या माळ्यावर असणारा समाज कल्याण विभागाचा टेबल हा तळमजल्यावर आनण्यात यावा अशी मागणी अपंग बांधवांकडून करण्यात येत आहे.

# सिडकोच्या लॉजिस्टिक पार्कला धुतुम ग्रामस्थांचा कडाडून विरोध

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : लॉजिस्टिक पार्कसाठी सिडको प्रशासनाने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत येणाऱ्या मौजे जासई,चिर्ले, बेलोंडेखार, कौलीबेलोंडेखार, पौंडखार, गावठाण, जांभूळ पाडा व धुतुम या उरण तालुक्यातील आठ गावांतील शेतजमिनी सिडको प्रशासन लॉजिस्टिक पार्क विकसित करण्यासाठी संपादित करीत आहे.आला विरोध दर्शविण्यासाठी धुतुम गावचे सामाजिक कार्यकर्ते शरद ठाकूर यांनी ग्रामस्थांना विश्वासात घेऊन गाव व जमीन बचावासाठी अधिक लक्ष घेतले आहे.

सिडकोच्या या लॉजिस्टिक पार्कला आमचा प्रखर विरोध असल्याचे शरद ठाकूर यांनी धुतुम ग्रामपंचायतीच्या सरपंच रेश्मा ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत नमुद केले आहे. तशा प्रकारे विरोध असल्याबाबत धुतुम ग्रामपंचायतीने तात्काळ ठराव घेऊन सिडकोसह राज्याचे मुख्यमंत्री, नगरविकासमंत्री, विरोधीपक्ष नेते, महसूलमंत्री,कोकण विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी, भूमी अभिलेख उरण, तहसिलदार उरण व गटविकास अधिकारी उरण यांना निवेदनाद्वारे कळविण्यात आल्याचे म्हटले आहे. मौजे धुतुम ग्रामपंचायत हद्दीतील राष्ट्रीय महामार्गाच्या पूर्वेकडील ग्रामस्थांची राहती घरे, व्यावसायिक गाळे तसेच नवे कब्जा वहिवाट असून,सदरचे क्षेत्र २०१८ मध्ये मूळ गावठाण व विकसित गावठाण म्हणून शासनाकडे प्रस्तावित केले असल्याचे सांगितले. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे लॉजिस्टिक पार्क विकसित करणे हे गावकाऱ्यांच्या हक्कांच्या विरोधात असून, यासाठी भूसंपादनास ग्रामस्थांचा विरोध आहे. सिडकोने १९७० केलेल्या भूसंपादनाला ५० वर्षे उलटून गेली.मात्र आजतागायत प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंड मिळाले नाहीत. या प्रकल्पांमुळे येथील बागायती,मासेमारी,शेती,रेती व वीटभट्टी व्यवसायिक चिरडला असून, त्यांचेही कोणत्याही प्रकारे पुनर्वसन करण्यात आले नाही.त्याच प्रमाणे सिडकोने धुतुम ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रेल्वेस्थानकाचे नाव रांजणपाडा असे चुकीचे देण्यात आले असून,ते धुतुम असे करण्यात यावे असेही निवेदनात नमूद करण्यात आले असल्याचेही ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे माझे पक्षकाराचे वतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मुळ भूखंड मालक १) श्री.रोहिदास बाळकृष्ण घरत यांचे ताबा कब्जात व वहिवाटत नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा भूखंड आहे. त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :

**भूखंडाचे वर्णन**

**नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूखंड मालकाचे नाव | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| श्री.रोहिदास बाळकृष्ण घरत | ओवळे-आयसीआयजी-३० | ०१ | १८१ | ४५० चौ.मी. |

सदर आमचे पक्षकार १) श्री.रोहिदास बाळकृष्ण घरत यांनी वर वर्णनाचा भूखंडामधील ४५० चौ.मी. क्षेत्रापैकी अविभाज्य हिस्सा आमचे पक्षकाराचे भाऊ १) श्री.प्रकाश बाळकृष्ण घरत यांना बक्षिस पत्राद्वारे द्यावयाचे ठरविलेले आहे. तरी सदरहू मिळकतीवर / भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार वकीलांच्या पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे / भूखंडाचे बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०३/२०२१

**सही/-**
**ॲड.कैलास नारायण घरत**
**शॉप नं.०३, नित्यानंद अपार्टमेंट,**
**देवधर वाडा, (प्रभुआळी), आदर्श**
**हॉटेल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९५९४६५३७७७**

राव साहेब

ॲड.कोमल सिंग

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३१६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०४/२०२१

१) डॉ.अनिता लाल
रा.६६०४, व्हॅलेसिटी, डॉ.ऑस्टिन,
टी एक्स, ७८७५९, संयुक्त राज्य अमेरिका,
मुखत्यार धारक श्री.श्याम पी.देशमुख
रा.४०३, इमारत क्र.१८, बी विंग, के.एच.१,
सेक्टर १६, खारघर, नवी मुंबई-४१०२१० अर्जदार

या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचा भाऊ कै.श्री.रंजीत श्याम लाल दि.१२/१०/२०२० रोजी बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी मयत झाले आहे.

सदर मयताचे मृत्यूपश्चात वरील अर्जदारांची वारसनोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. कै.श्री.रंजीत श्याम लाल हे मयत झाले असून, त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे नावाची नोंद असलेली मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**निवासी सदनिका**

**१) सी-४०६, भूमी हाईटस्,**
**सेक्टर ८, प्लॉट नं.५ व ६,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**

**२) बँक खाते क्र.०००००३७६३०४४६४९९, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा खारघर, नवी मुंबई.**

**३) बँक खाते क्र.२२५-१-०६२८१८-० स्टॅंडर्ड चार्टर्ड बँक.**

येणेप्रमाणे निवासी सदनिका आहे. परंतु ते हयात नाहीत त्यांचे वारस म्हणून वरील अर्जदार यांस हे निवासी सदनिका मिळावेत. म्हणून या न्यायालयात वारसदाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदारांना वारसदाखला देणे विषयी कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत कोर्टात दाखल करावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१७/०३/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केला निषेध

नवी मुंबईतील ठाणे जिल्हा, पनवेल व उरण येथील सिडको बाधित ९५ गावांतील भूमिपुत्र, नैना प्रकल्प, एस.ई.झेड, जे.एन.पी.टी., विरार अलिबाग कॉरिडोर, विमानतळ बाधित शेतकरी व मच्छीमार, एम.आय. डी.सी., लॉजिस्टिक्स पार्क या सर्वांनी बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी आज सकाळ पासून कोरोना संबंधित सर्व नियमांचे सोशल डीस्टंसिंग चे पालन करून आपापल्या घरी तसेच गावांतील प्रमुख ठिकाणी हातात निषेधाचे फलक घेऊन सिडकोच्या निषेध व्यक्त करीत होते.

यावेळी प्रामुख्याने करण्यात आलेल्या आरोपांमध्ये सिडकोमार्फत कशा पद्धतीने शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात आला ? शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा नैना प्रकल्प शेतकऱ्यांच्या माथी मारून धनदांडग्यांना मोठे करण्याचा घाट घालण्यात आला, याबाबतच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध यावेळी करण्यात आला. तसेच १७ मार्च २०२० रोजी ५० हजार शेतकऱ्यांचा आझाद मैदान, मुंबई मंत्रालयावर लाँग मार्च काढण्याचे जाहीर करण्यात आले होते, मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जरी हा मोर्चा रद्द करण्यात आला असला तरीही कोरोना संपेपर्यंत जर सिडको बरखास्त केली गेली नाही, तर याही पेक्षा मोठा मोर्चा शेतकरी मंत्रालयावर नेतील, असे मत यावेळी निषेधकर्त्यांनी व्यक्त केले.

सिडकोने प्रकल्पग्रस्तांना देशोधडीला लावण्याचे काम आजतागायत केले आहे. आता नैना व लॉजीस्टिक पार्क सारखे प्रकल्प येऊ पहात आहेत. त्यासाठी कवडीमोल भावाने जमीन संपादित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हिताचा कोणताही विचार सिडको करताना दिसत आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी दहशतीच्या बळावर बळकाविण्याचा प्रयत्न केला तर हा प्रयत्न हाणून पाडू. त्यासाठी वेळप्रसंगी १९८४ च्या आंदोलनाची पुनरावृत्ती केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा नवी मुंबई ९५गावं नैना व इतर प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती अध्यक्ष ड सुरेश ठाकूर यांनी राज्य शासन व सिडको प्रशासनाला दिला. सिडकोचा वर्धापन दिन हा प्रकल्पग्रस्तांनी काळा दिवस म्हणून पाळण्याचे ठरविले होते. त्याला प्रकल्पग्रस्तांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देऊन आपल्या भावना तीव्र शब्दात व्यक्त करून सिडकोचा निषेध केला. आजचा कार्यक्रम यशस्वी झाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये लढण्याची ताकद निर्माण झाली आहे.

## रोह्यात कपड्याच्या दुकानाला आग ; लाखोंचे नुकसान

त्वरित उपनगराध्यक्ष महेश कोल्हाटकर, जितेंद्र दिवेकर यांसह सहकारी वर्गाने धाटाव येथील अग्निशमन विभागाला संपर्क करताच काही वेळातच अग्निशमन दलाची गाडी येताच तेथील जवानानी आपले प्रयत्न सुरू करून आग नियंत्रणात आणल्याने पुढील अनर्थ टळला.

याठिकाणी प्रकाश नामदेव साळुंखे याने नव्याने कपड्याचे दुकान सुरू केले होते. या आगीत जीवित हानी मात्र झाली नसली तरी लाखो रुपयाचे वित्त हानी झाली आहे. या अचानक लागलेल्या आगीत भस्मसात होऊन हाती काहीच न राहिलेल्या साळुंखे कुटुंबियांवर मात्र मोठे संकट कोसळले आहे. दरम्यान मध्यरात्री लागलेली ही आग शॉर्ट सर्किट मुळे लागली की अन्य कारणामुळे याचा रोहा पोलीस तपास करीत आहेत.

## मारहाण प्रकरणी ग्रामपंचायत सदस्याला अटक

असता तुषार नकुल पाटील यांनी बाळासाहेब कामठे (२६), महेंद्र पाटील (४३) आणि राजू वालकोंडे (४४) या तीन कर्मचाऱ्यांना कमरेच्या पट्ट्यानी बेदम मारहाण केली. या प्रकरणी उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तुषार पाटील याच्यावर भादवि कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान आरोपीला अटक होत नसल्यामुळे महावितरणच्या कर्मचारी संघटनेतर्फे आज सकाळी आंदोलन सुरू केले होते मात्र पोलिसांनी सकाळी आरोपीला अटक केल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मेढा हायस्कूल मध्ये गणवेश वाटप



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री ना. अदिती तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मेढा ग्रुप ग्रामपंचायत, भिसे ग्रुप ग्रामपंचायत वतीने को.ए.सो मेढा हायस्कूल मधील गरीब गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचा कार्यक्रम रोहा पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मण महाले यांच्या अध्यक्षतेखाली व रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा कार्याध्यक्ष महेंद्र खैरे, हायस्कूलचे चेअरमन भगवान गोवर्धने यांच्या उपस्थित व मान्यवरांच्या शुभहस्ते मुलामुलींना शालेय गणवेश व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी लक्ष्मण महाले यांनी पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या शैक्षणिक, सामजिक, सहकार आणि राजकीय क्षेत्रातील कार्याचा गौरव करीत मंत्रिमंडळात महत्वाच्या आठ खात्यांचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळीत, युवा मंत्री म्हणून आपल्या कार्यशालीची छाप विधिमंडळात पाडली आहे. त्या नेहमीच सर्वांना व कार्यकर्त्यांना प्रेमाची वागणूक देत, रायगड मध्ये विकासकामांच्या योजना राबवत आहेत. एक कर्तृत्ववान युवा महिला म्हणून त्यांनी सर्वच क्षेत्रात नावलौकिक केला आहे. यासाठी त्यांना खासदार सुनिल तटकरे विधानपरिषद आमदार अनिकेत तटकरे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळते. ताईंनी आपल्या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध शालेय स्पर्धेचे आयोजन व भेट देऊन शाळेला भौतिक सुविधा प्राप्त करून दिल्या तसेच चेअरमन भगवान गोवर्धने, सरपंच चंद्रकांत ठमके आदिंनी त्यांच्या कार्याचा गौरव करीत आजच्या तरुण पिढीनी त्यांचा आदर्श घ्यावा असे सांगितले या कार्यक्रमासाठी उपसरपंच नम्रता सुतार, सदस्य उदय मोरे, ज्ञानेश्वरी गोवर्धने, भिसे उपसरपंच तानाजी जाधव माजी सरपंच विलास उंबरे, संतोष सुतार, रघुनाथ करंजे, भगवान करंजे, भगवान मोहिते, नथुराम महाले, आत्मराम घरट, शुभम उंबरे, छगन लाड, मुख्याध्यापिका हेमलता देवकाते, डी आर म्हात्रे सर, प्रदीप जोशी सर, भरसट सर, पाटील सर, कांबळे सर, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डी आर म्हात्रे तर आभार देवकाते मॅडम यांनी मानले, उपक्रमाबाबत धन्यवाद देण्यात आले.

# पनवेलच्या स्वस्तिका घोषने जिंकले राष्ट्रीय विजेतेपद लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया आणि मध्यप्रदेश टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यप्रदेशमध्ये पार पडलेल्या '८२ व्या ज्युनिअर अँड युथ नॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२०' या राष्ट्रीय स्पर्धेत पनवेलच्या स्वस्तिका घोषने अंडर १८ मुलींच्या गटात विजेतेपद जिंकले असून त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिका घोषचे अभिनंदन करून कौतुक केले. यावेळी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या प्राचार्या राज अलोनी, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, स्वस्तिकाचे पालक व प्रशिक्षक संदीप घोष आदी उपस्थित होते.




मध्यप्रदेश मधील अभय प्रशाल इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेतील अंतिम सामन्यात पनवेलच्या स्वस्तिकाने सुहाना सैनीविरुद्ध जादा गुणांवर गेलेला दुसरा गेम गमावला होता, पण त्यानंतर स्वस्तिकाने प्रतिकार करीत ७-११, ११-१३, ११-७, ११-४, ११-६, ११-९ अशी बाजी मारली. प्रथमच कुमारी गटात खेळलेल्या स्वस्तिकाने दोन गेम गमावल्यानंतरही दोन्ही कोपऱ्यातून निर्णायक आक्रमण केले. तिची प्रतिस्पर्धी म्हणून खेळलेल्या सुहाना सैनी हि नेटच्या जवळ सर्व्हिस करण्यात माहीर असल्याने तिच्या विरोधात खेळताना साहजिकच दडपण होते, खेळताना स्वस्तिका पिछाडीवर गेली मात्र तिने हार पत्करली नव्हती, त्यामुळेच तिने वेगाने पुढे झुकत सुहानाची सर्व्हिस परतवून लावत तिचा पराभव करून विजेतेपद पटकाविले.

खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलची ती इयत्ता बारावीची विद्यार्थीनी असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला फ्रान्स येथे प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत, तसेच रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सरावासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबलटेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. हाँगकाँग, स्पेन, जॉर्डन, कोलंबो, यांसह इतर देशामध्ये झालेल्या स्पर्धेत स्वस्तिकाने अजिंक्यपद पटकाविले आहे. स्वस्तिकाने लहानपणापासून टेबलटेनिस खेळात आपली आवड व नैपुण्य दाखविले आहे. त्यामुळे तीला 'विराट कोहली फाऊंडेशन' कडून स्कॉलरशिप प्राप्त झाली आहे. ती भारतातील एकमेव टेबल टेनिस खेळाडू आहे, जी या संस्थेद्वारे स्कॉलरशिपसाठी निवडली गेली आहे.

स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत. ओमान येथे झालेल्या 'ओमान ओपन' स्पर्धेत भारतीय कर्णधार म्हणून यशस्वी जबाबदारीही स्वस्तिकाने पार पडली, त्यावेळी या स्पर्धेत तीने कांस्य पदक मिळविले आणि पदक मिळविणारी भारताची एकमेव खेळाडू ठरली. स्वस्तिकाने २०१३ मध्ये गुजरातमध्ये राष्ट्रीय रँकिंग सेंट्रल झोन टेबल टेनिस चॅम्पियनशिप जिंकली आणि त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. प्रत्येक वर्षी तिने आपल्या खेळातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती दाखविली आहे. दोन वर्षांपूर्वी पुणे येथे राज्य सरकारच्या माध्यमातून झालेल्या स्पर्धेतही स्वस्तिकाने सुवर्णयश कामगिरी केली. केंद्र शासनाच्या विविध क्रीडा प्रकार असलेल्या 'खेलो इंडिया युथ गेम' या स्पर्धेतही तिने नेत्रदिपक कामगिरी केली होती.

त्याचप्रमाणे '८२ व्या ज्युनिअर अँड युथ नॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२०' राष्ट्रीय स्पर्धेत विजेतेपदाचा 'किताब जिंकून स्वस्तिका घोषने अंडर १८ मुली गटात टेबल टेनिस श्रेणीतील ऑल इंडिया रँक ०१ तर जागतिक रॅंकमध्ये पाचव्या क्रमांक कायम राखले आहे.

> लोकनेते रामशेठ ठाकूर, तसेच विद्यालयाने व प्राचार्या राज अलोनी यांनी स्वस्तिकाच्या प्रगतीसाठी नेहमीच मदतीचा हात दिला आहे. वेळोवेळी मार्गदर्शन करून तिला प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्याकडून होत असलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. टेबल टेनिस मध्ये स्वस्तिकाने राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अनेक बक्षिसे मिळविली, पण या स्पर्धेत जिंकलेले राष्ट्रीय चॅम्पियनशिप बहुमोल असून हे पारितोषिक लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाला समर्पित करतो.
>
> **- संदिप घोष- स्वस्तिकाचे पालक व प्रशिक्षक**

# सुधागड तालुक्यात कोरोनाचा कहर, ३ नव्या कोरोना रुग्णांची भर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात कोरोना रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होतेय. सायंकाळी उशिरा प्राप्त अहवालानुसार मंगळवारी (दि. १६) कोरोनाचे ३ रुग्ण सापडले आहेत. तर ४ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली. नागरिकांनी कोरोना काळात काळजी घ्यावी, नियम पाळावेत अशा सूचना प्रशासन देत असले तरी नागरिक बेफिकीरीने वावरताना दिसत आहेत.

सध्या तालुक्यात कोरोनाचे १९ सक्रिय रुग्ण असून यातील १७ रुग्ण गृहविलगीकरणमध्ये तर २ रुग्ण रूग्णालयात उपचार घेत आहे. सुधागड तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ४७५ रुग्ण झाले असून ४३० रुग्ण बरे झाले आहेत. आणि २६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली आहे.

# ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात अश्विन प्रभू, आरुष नित्तुरे यांची निवड

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सॉफ्ट टेनिस असोसिएशन ऑफ इंडिया च्या वतीने २१ मार्च ते २५ मार्च २०२१ रोजी गुजरात येथे होणाऱ्या ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघातून रायगडच्या आरूष नित्तूरे व अश्विन प्रभू यांची निवड करण्यात आली आहे.नुकत्याच मुंबई येथे झालेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेतून दोघांची निवड झाल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे.राष्ट्रीय स्पर्धेसाठी झालेल्या निवडीबद्दल रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या अध्यक्षा तथा पनवेल मनपा नगरसेविका सिताताई पाटील,सचिव स्वप्नील वारंगे,खजिनदार हेमंत पयेर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी आरुष आणि अश्विन यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे : उसर्ली (खुर्द), ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकतीबाबतचे अखत्यारपत्र माझे अशिल श्री.गुलाब खुरबुर यादव व श्री.रामबदन खुरबुर यादव व श्री.सुरेश फौजदार यादव यांनी श्री.सुभाष फौजदार यादव यांना दि.२२/०२/२०१७ रोजी नोंदणीकृत दस्त क्र. पवल-१७०६/२०१७ ने दिले आहे. सदरचे अखत्यारपत्र हे माझे अशिलांनी वकीलांमार्फत दि.२/०३/२०२१ रोजीच्या नोटीसीने रद्द केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | गट/सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे उसर्ली (खुर्द), ता.पनवेल, जि.रायगड | १३८ | १ | ००.४१.२ | --- |
| | १३८ | २ | ००.४०.०० | --- |

तरी या नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, सदरहू मिळकतीबाबत श्री.सुभाष फौजदार यादव यांचे बरोबर कोणत्याही प्रकारचा खरेदी/विक्री तसेच इतर कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. या उपरोक्त व्यवहार केल्यास माझे अशिल त्यास जबाबदार राहणार नाहीत.

पनवेल

दि.१७/०३/२०२१

**सही/-**
**अॅड.रमेश स.महाडिक**
**म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, गाळा नं.१९, शिवाजी चौक, मार्केट रोड, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

मे.मुजावर साहेब

अर्जदारातर्फे वकील
अॅड.अश्विनी पाटील-थवई

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४००/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०४/२०२१

श्रीमती.सरुबाई सुखदेव मोटे, वगैरे ४
वय : वर्षे, धंदा : काहीनाही
रा.के.एल.२, बिल्डींग नं.२९, रुम नं.७,
नवीन इंग्लिश शाळेजवळ, सेक्टर ६ ई,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार श्री.सुखदेव दाजी मोटे यांचे तारीख २५/०६/२०१८ रोजी मु.निंबवडे, ता.आटपाडी, जि.सांगली येथे निधन झाले आहे. श्री.सुखदेव दाजी मोटे यांस त्यांचे पश्चात अर्जदार क्रमांक २ ते ४ ही मुले असून अर्जदार क्रमांक १ ही त्यांची पत्नी असे वारस आहेत. त्याबाबत अर्जदार यांनी पनवेल येथील दिवाणी न्यायालयात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील, के.एल.२, बिल्डींग नं.२९, रुम नं.७, नवीन इंग्लिश शाळेजवळ, सेक्टर ६ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार यांनी कै.सुखदेव दाजी मोटे यांच्या मृत्यूच्या पश्चात अर्जदार यांनी वारसदाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस इंडियन सक्सेशन अॅक्टनुसार वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर हरकत/तक्रार सबब तसे वारसदाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाच्या काही हरती असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात तारीख १९/०४/२०२१ रोजी मे.कोर्टात दाखल कराव्यात. अन्यथा अर्जदारांस वारसदाखला दिले जाईल. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१७/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालिल वर्णनाची जमिन मिळकतीच्या कब्जेदार सदरी नाव असलेले मुळ शेतकरी १) गोपाळ बंडाचार्य जमदग्नी, २) चंद्रकांत एस शहा, ३) प्रदिप एन. शहा, ४) हर्षद धरमसी व्होरा, ५) ज्योती जितेंद्र व्होरा यांच्या मालकी हक्कात वहीवाटीत आणि, ताबेकब्जात खालील नमूद केलेली जमिन मिळकत आहे. त्या जमिन मिळकतींचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-मोहीली तर्फे वऱ्हेडी आणि निकोप, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील**

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मोहीली तर्फे वऱ्हेडी | ७/६ | ०-७४-००<br>पो.ख. ०-०८-०० | ०-५३ |
| निकोप | ५/१९ | ०-२८-०० | ०-२५ |
| निकोप | ५/२ | १-३६-००<br>पो.ख. ०-०६-०० | १-१९ |
| निकोप | १४/४ | १-०४-०० | ०-८३ |
| निकोप | १०/९ | ०-०४-८०<br>पो.ख. ०-००-५० | ०-३७ |
| निकोप | १३/४ | ०-१३-००<br>पो.ख. ०-०२-०० | ०-०९ |
| निकोप | ९/५ | ०-०५-१०<br>पो.ख. ०-००-२० | ०-३७ |

सबब वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीच्या कोणताही गहाण, दान, बक्षीस, खरेदी साठेकरार, खरेदीखत, मिळकत विकसीत करण्याबाबतचा करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हित संबंध दिवाणी दावा महसूली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे तसेच आमचे अशिलांचे पत्त्यावर हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल श्री. बाळकृष्ण पोशा भोईर, रा.पनवेल यांच्याबरोबर महसुल कायद्या प्रमाणे कायदेशिर बाबीची पुर्तता करून व्यवहार करून खरेदीखत पूर्ण करतील. व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

स्थळ :- पनवेल,
दिनांक:१७/३/२०२१

**सही/-**
**अॅड. निशा प्रभाकर पाटील**
**बालाजी अर्पाटमेंट, फ्लॅट नं. १०४, दुसरा मजला, परदेशी आळी, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

मे.बहिर साहेब यांचे कोर्ट

अॅड.प्रदीप तु.मुंडकर
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३९८/२०२१
नि.नं.८
ने.ता.०३/०५/२०२१

१) श्री.लहू चाहू केणी
वय वर्षे ७१, धंदा : नोकरी
२) श्री.कमलाकर चाहू केणी
वय वर्षे ५८, धंदा : नोकरी
३) श्री.अरुण चाहू केणी
वय वर्षे ५०, धंदा : नोकरी
४) श्री.संदीप अंकुश केणी
वय वर्षे ३७, धंदा : नोकरी
५) श्रीमती.सुंदर अंकुश केणी
वय वर्षे ५९, धंदा : घरकाम
अ.क्र.१ ते ५ सर्व रा.मु.चिंचपाडा,
ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.ज्योत्स्ना प्रदीप गोवारी
वय वर्षे ३८, धंदा : घरकाम
रा.घर नं.२४२, कामोठे गाव,
पटेल प्लाझा जवळ, सेक्टर १७
ता.पनवेल, जि.रायगड
७) सौ.नंदिनी धनंजय घाटे
वय वर्षे ३४, धंदा : घरकाम
रा.भिंगारी, पो.ओएनजीसी, विठोबा मंदिरजवळ,
ता.पनवेल, जि.रायगड
८) श्रीमती.रुक्मिणी एकनाथ भोईर
वय वर्षे ६९, धंदा : घरकाम
रा.विचंबु, वरची आळी, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्रीमती.पार्वती दशरथ कासकर
वय वर्षे ५६, धंदा : घरकाम
रा.दिघोडे, वरची आळी, ता.उरण, जि.रायगड
१०) श्रीमती.चारुशिला अशोक भोईर
वय वर्षे ५३, धंदा : घरकाम
रा.उरण कोटनाका, राघोबा मंदिरजवळ,
ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

१) अर्जदार क्रं.१ ते ३ हे मयत कै.जानुबाई चाहू केणी यांचे मुलगे असून अर्जदार क्रं.४ हा नातू आहे व अर्जदार क्रं.६ व ७ ह्या नात्या आहेत. अर्जदार क्रं.५ ही सून आहे. तसेच अर्जदार क्रं.८ ते १० ह्या कै.जानुबाई चाहू केणी यांच्या मुली आहेत.

२) कै.जानुबाई चाहू केणी ह्या दि.०५/०४/२००६ रोजी मु.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत. तसेच कै.जानुबाई चाहू केणी यांचा मुलगा कै.अंकुश चाहू केणी यांचे दि.२/०९/२००५ रोजी मृत्यू झालेला आहे. कै.जानुबाई चाहू केणी यांचे पती कै.चाहू तुकाराम केणी यांचा दि.२७/०८/१९९२ रोजी मृत्यू झालेला आहे. अर्जदार हे कै.जानुबाई चाहू केणी यांचे कायदेशीर वारसदार आहेत या अर्जदारां व्यतिरिक्त आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.जानुबाई चाहू केणी व इतर यांची वडिलोपार्जित नावे असलेली खालील नमूद मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत होती. सदरची शेतजमीन मिळकत ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता शासनाने सिडको करिता संपादीत केलेली आहे.

**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु. केस नं. |
|---|---|---|---|---|
| ओवळे | ११८<br>१२२ | ०<br>१+२ | १-५६-१<br>१-३४-६ | २४२ |

अर्जदारांचे म्हणणे की, मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत झालेल्या शेतजमिनीबाबत सिडकोच्या २२.५ टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत.

४) वर कलम ३ मधील नमूद कै.जानुबाई चाहू केणी व इतर यांची वडिलोपार्जित शेतजमीन ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत झालेली असून संपादीत शेतजमीन मिळकती बाबत सिडकोच्या २२.५ टक्के योजनेंतर्गत मिळणारे विकसित भूखंडाचे लाभ व आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारसदाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्रं.३९८/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतींबाबत अर्जदार हे कै.जानुबाई चाहू केणी यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जार्ठल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१७/०३/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.राव साहेब कोर्ट

अॅड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३७६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०५/२०२१

१) श्रीमती.फातीमा अ.रज्जाक पटेल
वय : ८० वर्षे, धंदा : काहीनाही
२) पै.मैनुद्दीन इब्राहीम पटेल (मयत तर्फे वारस)
२/१) श्री.मुनाफ मैनुद्दीन पटेल
वय : ५६ वर्षे, धंदा : व्यापार
२/२) कु.आयशाबीबी मैनुद्दीन पटेल
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
२/३) श्री.उमरमियाँ मैनुद्दीन पटेल
वय : ५० वर्षे, धंदा : व्यापार
२/४) सौ.सुरय्या मतीन सोंडे
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
२/५) श्री.दस्तगीर मैनुद्दीन पटेल
वय : ४० वर्षे, धंदा : व्यापार
२/६) सौ.हाजीरा सरफराज सोंडे
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
२/७) श्री.सरफराज मैनुद्दीन पटेल
वय : ३५ वर्षे, धंदा : व्यापार
३) पै.म.इस्माईल म.इब्राहीम पटेल (मयत तर्फे वारस)
३/१) श्री.म.इब्राहीम म.इस्माईल पटेल
वय : ५० वर्षे, धंदा : व्यापार
३/२) पै.हालीमा अ.रऊफ पटेल (मयत तर्फे वारस)
३/२/१) अ.रऊफ अ.रज्जाक पटेल
वय : ५१ वर्षे, धंदा : व्यापार
३/२/२) कु.अरबाज अ.रऊफ पटेल
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
३/२/३) कु.शहबाज अ.रऊफ पटेल
वय : २१ वर्षे, धंदा : शिक्षण
३/२/४) कु.तस्कीन अ.रऊफ पटेल
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार क्रं.३/२/१ स्वतःकरिता व क्रं.
३/२/४) तर्फे अ.पा.क.म्हणून वडील
३/३) सौ.मैमुना म.शफी मुफ्ती
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
३/४) सौ.नुरजहा मुनीर दिवडे
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
३/५) सौ.शाबीरा अ.रहेमान बोंबे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
३/६) सौ.जुलेखा म.इस्माईल पटेल
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
३/७) सौ.शबनुर अ.वहाब पटेल
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
३/८) सौ.शाहिस्ता मन्नान मास्टर
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
३/९) सौ.रुखसाना दस्तगीर पटेल
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
४) पै.नजमा मिया पटेल (मयत तर्फे वारस)
४/१) सौ.शारबानु अन्वर पटेल
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
४/२) श्री.जलील मियाँ पटेल
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यवसाय
४/३) सौ.मेहरुन्निसा सलीम पटेल
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
४/४) श्री.अ.करीम मियाँ पटेल
वय : ४६ वर्षे, धंदा : व्यवसाय
४/५) श्री.जाविद मियाँ पटेल
वय : ३८ वर्षे, धंदा : व्यवसाय
४/६) सौ.शाहिस्ता मुजम्मील मजीद
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
४/७) पै.मुनाफ मियाँ पटेल (मयत तर्फे वारस)
४/७/१) सौ.नुरजहा मुनाफ पटेल
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
४/७/२) श्री.शहजाद मुनाफ पटेल
वय : २५ वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं. अर्जदार क्र.१ चे भाऊ व अर्जदार क्रं.२/१ ते २/७ आणि ३/१ व ३/३ ते ३/९ आणि अर्जदार क्रं.४/१ ते ४/६ यांचे चुलते आणि अर्जदार क्रं.३/२/२ व ४/७/१ चे चुलत सासरे, आणि अर्जदार क्रं.३/२/३ व ३/२/४ आणि अर्जदार क्रं.४/७/२ चे चुलत आजोबा आणि अर्जदार क्रं.४/१ ते ४/७ यांचे मामा पै.मोहम्मद अली इब्राहीम पटेल हे दि.२४/०४/१९९९ रोजी मौजे : तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले असून, अर्जदार नं.१ ते ४/७/२ हेच पै.मोहम्मद अली इब्राहीम पटेल यांचे वारसदार आहेत तसेच यांच्याशिवाय कोणीही वारसदार नाहीत.

तसेच पै.मोहम्मद अली इब्राहीम पटेल ह्यांच्या स्वमालकीची व सामाईक मालकीची मौजे : तळोजा पाचनंद संचिका क्रं.१०३ शेतजमीन व सामाईक मालकीची संचिका क्रं.३९४ आहेत त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | ३९४ | ८७ | ३ | ०-०७-०३ |
| तळोजा पाचनंद | ३९४ | ८९ | ३ | ०-११-०१ |
| तळोजा पाचनंद | १०३ | ७१ | ० | ०५-३७-० |

अर्जदारांचे वडील पै.मोहम्मद अली इब्राहीम पटेल यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्ज वर पॅरा नं.५ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.मोहम्मद अली इब्राहीम पटेल यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या पै.मोहम्मद अली इब्राहीम पटेल यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १६/०३/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## केमस्पेक केमिकलमध्ये सुरक्षा सप्ताह संपन्न

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : तळोजा औद्योगिक वसाहती मधील केमस्पेक केमिकल प्रायव्हेट लिमिटेड तळोजा येथे ५० वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह संपन्न सुरक्षा विभाग प्रमुख डी पी शेगेकर यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन.

केमस्पेक केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या औधोगिक कारखान्यात सुरक्षा सप्ताहा निमित्त कामगार आणि कामगारांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुरक्षा पोस्टर स्पर्धा, सुरक्षा कविता, सुरक्षा निबंध आणि सुरक्षा घोषवाक्य अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या स्पर्धांमधून अव्वल नंबर पटकावलेल्या कामगारांना बक्षीस वितरित करण्यात आले. या सप्ताहात दरम्यान कारखाने मध्ये विविध प्रकारच्या सुरक्षा विषयक प्रत्येकक्षीकांचे आयोजन आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तलोजा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील व तळोजा चे फायर सेफ्टी ऑफिसर दीपक दोरुगडे उपस्थित होते. यावेळी कारखान्याचे डायरेक्टर राजिंदर हरकारा,प्रबंधक संदीप ओझा, सुरक्षा विभाग प्रमुख डी पी शेगेकर व श्याम आहिरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तर सदाशिव आढागळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## जागतिक ग्राहक दिनानिमित्त अन्न व औषध प्रशासनातर्फे गुगल मीट वेबिनार संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून अन्न व औषध प्रशासन , म. रा. रायगड पेण द्वारे गुगल मीट वेबिनार आयोजीत करण्यात आले.

सदर वेबिनार मध्ये रामसिंग एफ. राठोड उप नियंत्रक वैधमापन शास्त्र, रायगड जिल्हा यांनी वैधमापन शास्त्र कायद्यामधील तरतुदी व ग्राहकांचे हित यावर प्रबोधन केले. वस्तू व सेवा खरेदी करताना ग्राहकांचे अधिकाराबाबत तसेच अधिकारांचा भंग झाल्यावर दाद कुठे व कशी मागवावी याबाबत मार्गदर्शन केले. संतोष घोडींदे जेष्ठ फार्मासिस्ट, पनवेल यांनी त्याच्या प्रदीर्घ अनुभवावरून औषधे खरेदी करताना, हाताळताना काय काय काळजी घ्यावी याबाबत विवेचन दिले. प्रशासनातील वरीष्ठ औषध निरीक्षक डॉ. मुकुंद डोंगळीकर यांनी औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, औषध किंमत नियंत्रण आदेश, नारकोटीक्स ड्रग्स कायदा या कायद्यामधील तरतुदीबाबत सखोल विवेचन केले.

# सिडकोच्या लॉजीस्टिक पार्क संदर्भात शेतकरी अंधारात ; शेतकरी न्यायालयीन लढाई लढणार

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडकोच्या माध्यमातून उरण परिसरात उभे २७७ हेक्टरवर लॉजीस्टिक पार्क उभे करण्यात येणार आहे. या संदर्भात सिडकोने कोणतीही अधिसूचना अथवा जनसुनावणी न घेता थेट शेतकर्यांकडून संमती पत्राची मागणी केली आहे. सिडकोने शेतकर्यांना अंधारात ठेवले असल्याने ते आता न्यायालयीन लढाई लढण्याच्या तयारीत असल्याचे समजते. यामुळे हा प्रकल्प रखडण्याची शक्यता आहे.

जेएनपीटी बंदरातील कंटेनर चालकांसाठी उभारण्यात येत असलेल्या लॉजीस्टिक पार्कच्या भूसंपादनाला सिडकोने सुरुवात केली आहे. काही दिवसांपूर्वी उरण तालुक्यातील बेलेंडोखार, कौली बेलेंडोखार, पौंडखार, जासई, धुतुम, चिरले, गावठाण, जांभुळपाडा या ८ गावा-तील २७७ हेक्टर जमीन संपादित करण्याचे परिपत्रक सिडको मार्फत काढण्यात आले आहे. केंद्र सरकारने सागरमाला प्रकल्पा अंतर्गत जलवाहतुकी सोबत बंदरे उभारणीवर लक्ष केंद्रित केले आहे. जेएनपीटी बंदरात सध्या सुरु असलेल्या ४ बंदराबरोबर आणखीन २ बदरांची भर पडणार आहे. या नव्या

बदरांसोबत जेएनपीटीतर्फे विशेषआर्थिक क्षेत्र देखील विकसित केले जाणार आहे. नुकताच जेएनपीटीने महत्वाच्या कंपन्या सोबत २७ हजार कोटींचा सामंजस्य करारही केला आहे. उरणमार्गे नवी मुंबई, मुंबईशी जोडणारा न्हावा शेवा शिवडी सागरी सेतूचे काम ही मार्गी लागणार आहे. या सर्व प्रकल्पामुळे उरण, जेएनपीटीसह संपूर्ण नवी मुंबईचा कायापालट होणार आहे. जेएनपीटी बंदरात कंटेनरचा वावर वाढल्यानंतर अद्ययावत लॉजीस्टिक पार्कची गरज लागणार आहे. ही गरज ओळखून सिडको मार्फत या भागात भव्य लॉजीस्टिक पार्क उभारले जाणार आहे. लॉजीस्टिक पार्कला जमीन देणार्या शेतकर्यांना २२.५ टक्के विकसित भूखंड दिले जाणार आहेत. त्याकरिता शेतकर्यांनी आपले संमतीपत्र भरून सिडको कार्यालयात जमा करण्याचे परिपत्रक मुख्य भूमी व भूमापन अधिकारी सतीशकुमार खडके यांनी काढले आहे.

परंतु कोणताही प्रकल्प येण्याआधी त्यापासून कोणकोणते फायदे-तोटे आहेत याची पूर्ण माहिती देणे आवश्यक असते. तसेच या संदर्भात जनसुनावणी बरोबर येणार्या हरकतीवर विचारविनिमय शेतकर्यांना विश्वासात घेऊन करणे आवश्यक असतानाही तसे न करता सिडकोने प्रकल्प शेतकर्यांवर लादलून थेट संमतीपत्र घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. शेतकर्यांनी संमतीपत्र भरून दिल्या नंतर तो सुविधांपासून वंचीत होणार आहे. यामुळे शेतकरी वर्ग पूर्णपणे अंधारात आहे. कारण सिडकोने यापूर्वी जी जी आश्वासने दिली होती. ती आजतागायत प्रलंबित असतानाच हा प्रकल्प शेतकर्यांच्या माथी मारून त्यांना उध्वस्त करण्याचा घाट सुरू आहे.

याबाबत शेतकरी ज्याच्याकडे आशेने बघतो तेच नेतेमंडळी बरोबर गावचे सरपंच, गाव पुढारी जमिनीचे दलाल बनले आहेत. यामुळे जे जमीनीचे मालक आहेत, ते जमीन विकून देशोधडीला लागले आहेत. तर दलाली करणारे मालामाल झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सिडकोचा एवढा मोठा प्रकल्प येत असतानाही येथील स्थानिक नेतेगण आवाज उठवत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

लॉजीस्टिक पार्क म्हणजे काय याची निश्चित अशी माहिती नसली तरी कोणताही प्रकल्प आणताना त्या संदर्भात स्थानिकांची मते विच-ारात घेऊन जनसुनावणी होणे गरजेचे असतानाही सिडको कडून दिशाभूल करून जमीन संपादित करण्याचा घाट सुरू आहे. याबाबत कोणताच पक्ष अथवा नेतेगण आवाज उठवत नसले तरी आपण शेतकर्यांच्या मदतीने न्यायालयीन लढाई लढून न्याय मिळविल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचे शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते संदेश ठाकूर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# कारवाईसाठी गेलेल्या अतिक्रमण विभाग कर्मचाऱ्याला फेरीवाल्याचा चावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यासाठी गेलेल्या पनवेल महापालिका अतिक्रमण विरोधी पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्याला एका अनधिकृत फेरीवाल्याने धक्काबुक्की करुन मारहाण केल्याची तसेच एका कर्मचाऱ्याच्या बोटाला चावा घेतल्याची घटना पनवेलच्या कर्नाळा बाजार समोर घडली.

रमेश गणेश काले (३२) असे या अनधिकृत फेरीवाल्याचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करुन दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पनवेल महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाचे प्रमुख संतोष पाटील (३६) आपल्या पथकासह पनवेलच्या प्रभाग समिती ड विभागामध्ये फुटपाथ, रोड, दुकानाच्या बाहेर आणि वाहतुकीस अडथळा करणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यासाठी गेले होते. यावेळी कर्नाळा बाजारच्या समोरील रस्त्यावर आणि फुटपाथवर अनेक फेरीवाले महिला आणि पुरुष आपला माल विकण्यासाठी उभे असल्याचे तसेच त्यांच्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असल्याचे या पथकाच्या निर्दर्शनास आले.

त्यामुळे अतिक्रमण विरोधी पथकाचे प्रमुख संतोष पाटील यांनी आपल्या कर्मचार्यांना सदर अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यास सांगितले. त्यानुसार कर्मचारी तेथील फेरीवाल्यांचा माल ताब्यात घेण्यासाठी गेले असताना, रमेश गणेश काले या फेरीवाल्याने निलेश गोवारी या कर्मचाऱ्याला शिवीगाळ करुन त्याला धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली. त्यामुळे संतोष पाटील त्याच्याजवळ विचारपूस करण्यासाठी गेले असताना, रमेश काले याने त्यांच्याशी हुज्जत घालून त्यांच्या कानशिलात जोरात चापट मारली. यावेळी निलेश गोवारी याने त्याच्या फुलाची टोपली उचलली असता, त्याने गोवारी याच्या बोटाला चोरात चावा घेतला. त्यामुळे गोवारी याच्या बोटातून रक्तस्राव होऊ लागल्याने त्याला तत्काळ उपचारासाठी पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर अतिक्रमण विरोधी पथकातील इतर कर्मचाऱ्यांनी गोवारी याच्या बोटाला चावा घेणाऱ्या रमेश काले याला पकडून पनवेल शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानुसार पोलिसांनी रमेश काले याच्या विरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करुन त्याला दुखापत केल्याप्रकरणी ताब्यात घेतले आहे.

# स्वयंसिद्धा संस्थेच्या वतीने नागोठणे एस.टी स्थानकात लोककलेतून आरोग्य विषयक जनजागृती

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मी जबाबदार, कोविड लस सुरक्षित आहे, कोरोना अजून संपलेला नाही मास्क वापरा, सुरक्षित अंतर पाळा, सॅनिटायजर किंवा साबणाने वारंवार आपले हात स्वच्छ धुवा, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, आरोग्यदायी राष्ट्राची उभारणी - सुरक्षित जननी विकसित धरणी पहिल्या अपत्यासाठी मातेला रु. पाच हजाराचा लाभ, बाळाच्या आरोग्यासाठी योग्यवेळी लसीकरण करा, बेटी बचाओ, बेटी पाढाओ यांसह आरोग्य विषयक उपयुक्त माहिती देवून रोहा तालुक्यातील नागोठणे बस स्थानक, वाकण नाका, पिंगळसई या गावांमध्ये जनजागृती करण्यात आली.

रायगड जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, स्वयंसिद्धा सामाजिक विकास, संस्था, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी, राजिपचे उपाध्यक्ष तथा शिक्षण, क्रिडा व आरोग्य समितीचे सभापती सुधाकर घारे, राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

या लोककलेचे नेतृत्व जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजेंद्र भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसिद्धा संस्थेच्या वतीने



सुचिता साळवी करीत असून या जनप्रबोधनाच्या कार्यात सुचित जावरे, अमृता शेडगे, प्रांजली पाटील, श्वेता खारकर, प्रतीक कोळी, तुषार राऊळ, प्रसाद अमृते, कुणाल घुगे हे कलाकार सहभागी झाले आहेत. या कार्यक्रमास ग्रा . पं . सदस्य अतुल काळे, राकेश जावरे व मुस्तफा सैफी आदी मान्यवर व प्रवासी उपस्थित होते.

# कोरोना योध्दा म्हणून एस.टी.चालक वाहकांसह कर्मचाऱ्यांना प्राधान्याने कोरोना लसीकरण करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । उदय कळस**

**म्हसळा** : राज्यात कोरोना लसीकरणाच्या दुसरा टप्पा १ मार्च पासून सुरू आहे.कोरोना लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात पोलीस दलातील कर्मचारी, महसूल विभाग व जिल्हा परिषदेच्या शिक्षक, अंगणवाडी सेविका, कर्मचाऱ्यांच्या समावेश करण्यात आला आहे.

कोरोना योध्दा म्हणून या प्रत्येक विभागाच्या कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्यांत येऊन त्यांचे लसीकरण सुद्धा करण्यात येत आहे त्याचप्रमाणे कोरोना काळात परराज्यातील नागरिकांना त्यांच्या राज्यापर्यंत सोडण्यासाठी विशेष एस. टी. बसची सुविधा देणाऱ्या कोरोना योध्दा म्हणून रायगड विभागातील एस.टी. चालक वाहकांसह कर्मचाऱ्यांना प्राधान्याने लसी- करण करावे अशी मागणी श्रीवर्धन -म्हसळा प्रवासी सघटनेचे अनिल महामुनकर यानी परिवहन मंत्री अनिल परब व रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्याकडे केली आहे.

कोरोना काळात रायगड (पेण) विभागातील कर्जत, पेण, अलिबाग, मुरुड, रोहा, माणगाव, महाड, श्रीवर्धन या आठ आगारांतून लॉकडा-ऊनमध्ये परप्रांतीय मजुरांना १५६० गाड्यांनी त्यांच्या मूळ गावी सुखरूप पोहचवले. कोरोना काळात सुमारे ६ महिने अँम्ब्युलन्सची वाहतू - क केल. माहे सप्टेंबर२०२० पासुन कोरोनाचे संक्रमण वाढू नये, म्हणून मुंबईतील लोकल सेवा बंद करण्यात आली होती. प्रवाशांच्या सोयीसाठी लोकल सेवेला पर्याय म्हणून बेस्ट बसच्या माध्यमातून बसफेऱ्याद्वारे प्रवाशांची वाहतूक करण्यात येत होती. बेस्ट बसवर पडणारा ताण व कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे विविध आगारातून कर्मचारी मुंबई येथे सेवा बजावण्यासाठी गेले होते. याच कालावधीत वाहतुकीसाठी रायगड विभागातून ७० गाड्यांची मदत केली. रायगड विभागात एकुण कर्मचारी २३८० आहेत

कोरोना कालावधीत राज्यातील अनेक शाळा बंद असतानाही सर्व शिक्षकांचा समावेश लसी करणासाठी प्राधान्याने करण्यात आला. शिक्षकांना दुसऱ्या टप्प्यात सामील केले गेले. शिक्षकांचे लसीकरण देखील सुरू झाले, त्याच प्रमाणे एसटी बसमध्ये चालक-वाहकांचा प्रत्येक प्रवाशांशी थेट संपर्क येत असूनही चालक वाहकाला लस दिली गेली नसल्याने लसीकरण संदर्भात नियोजन करणाऱ्या यंत्रणेने याबाबत तात्काळ विचार करून एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना लस द्यावी, अशी मागणी थेट प्रवाशां कडून होत आहे.

> याच कालावधीत राज्यातील अनेक चालक वाहकाना कोरोनाची लागण झाल्याच्या घटना घडल्या राज्यात कोरोना पुन्हा डोके वर करत असतानाच एस.टी. च्या चालक वाहकांचा ५० लाखांचा विमा उतरविण्यात यावा
>
> **अनिल महामुनकर,**
> **प्रवासी संघटना श्रीवर्धन -म्हसळा**

# पनवेल महापालिकेची उरण नाक्यावरील हातगाड्यांवर धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील उरण नाका परिसरात हातगाड्यांचा पसारा वाढत असल्याने वाहतूक कोंडी होत असल्याने पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने हातगाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

पनवेल परिसरातील उरण नाक्यावर वाहतूक कोंडी हि नित्याचीच आहे. येथे कधीही जावे तर वाहतूक कोंडी जाणवतेच. ज्या दिवशी येथे वाहतूक कोंडी जाणवणार नाही त्या दिवशी वाहनचालकांना चुकल्या सारखे वाटेल इतकी वाहतूक कोंडीची सवय नागरिकांच्या अंगवळणी पडली आहे. रस्त्यावरील बाजारपेठ आणि पार्किंग हि येथील वाहतूक कोंडीची प्रमुख कारणे आहेत.



त्याचबरोबर पनवेल परिसरात हातगाड्याचा पसारा मोठ्या संख्येने वाढत आहे. त्यामुळे हातगाडीवाले बिनधास्तपणे रस्त्यावर आपली हातगाडी लावत आहेत. पनवेल शहराची प्रमुख बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या टपाल नाका येथून उरण नाक्यापर्यंत फळे आणि भाज्या विक्री करणाऱ्या हातगाड्या उभ्या असतात. या गाड्या पुढे उरण नाक्यावर गर्दी करतात. त्यामुळे वाहतूक कोंडी वाढीचे मुख्य कारण आहे. हातगाड्यावर महापालिका वारंवार कारवाई करीत असते, मात्र आणखी हातगाड्या येताच कुठून असा सवाल उपस्तित होत आहे. वाहतूक पोलीस देखील वारंवार हातगाड्या हटविण्यास सांगत असतात, तरीही हातगाडीचालक त्याठिकाणावर ठाण मांडून असतात, पालिकेकडे वारंवार तक्रारी येत असल्याने अखेर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने उरण नाका परिसरात हातगाड्या जप्त केल्या आहेत. त्यामुळे वाहतूक फुटण्यास मदत होणार आहे.

काही महिन्यापूर्वी पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने हद्दीतील हातगाड्यावर कारवाईचा सपाट लावला होता. मात्र काही महिन्यांपासून कारवाई थंडावली असल्याने परिसरात हातगाड्यांची संख्या मोठ्या संख्येने वाढली आहे. उरण नाक्यावर पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे पथक येताच हातगाडीवाले आपली हातगाडी उरण नाका उड्डाणपुलाच्या पुढे म्हणजे सिडको हद्दीत वडघर, करंजाडे वसाहतीमध्ये पळ काढत असल्याचे दिसून येत आहेत.

मात्र यांच्यावर महापालिका व सिडको विभागाने सयुक्तिक कारवाई केली तरच हातगाडी मुक्त पनवेल व वसाहत होईल असे मत जाणकार व्यक्त करीत आहेत.

### सरकारने खोटी आश्वासने देऊन जनतेची अक्षरश: दिशाभूल केली

# वीज बिल प्रश्नावर सुधागड वंचित बहुजन आघाडी आक्रमक

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनासारख्या जागतिक संकटात पिचलेल्या सर्वसामान्य गोरगरीब जनतेची महाविकास आघाडी सरकारने वीज बिल प्रश्नावर खोटी आश्वासने देऊन अक्षरशः दिशाभूल केली असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. सरकारच्या फसव्या धोरणाविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली आहे, महावितरणने तोडलेली वीज कनेक्शन पूर्ववत करा , अन्यथा आत्मदहन करू असा गंभीर इशारा पालीत देण्यात आलाय.



वीजबिल प्रश्नावर सुधागड तालुक्यातील थकीत वीज देयके ग्राहकांचे तोडलेले वीज जोडणी त्वरित पूर्ववत करा, अन्यथा महावितरण कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी दिला आहे. वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी पाली महावितरण कार्यलायाबाहेर घेराव घालत मागण्यांचे निवेदन दिले आहे. सदर निवेदनात नमूद केले आहे की कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मागील एका वर्षापासून सर्वसामान्य जनतेच्या हाताला कुठलेही काम नाही. सर्वसामान्य जनता होरपळून हतबल झाली असताना महावितरण कंपनीने सर्वसामान्य वीज ग्राहकांचे विज बिल थकीत झाल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. त्यामुळे अनेकांना अंधारात राहावे लागत आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान त्याचबरोबर छोट्या-मोठ्या उद्योग करणाऱ्या लोकांचे आर्थिक नुकसान होत आहे. सरकारचे सतत बदलत असलेले धोरण महावितरणची मुजोरी व दंडेलशाही यामुळे सर्वसामान्य ग्राहक जेरीस आला असून या विरोधात प्रचंड आक्रोश करीत आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यातील थकित वीज ग्राहकांचे तोडलेले वीज कनेक्शन त्वरित पूर्ववत करावे, ग्राहकांना वीज बिल भरण्याकरिता टप्पे ठरवून द्यावे, ग्राहकांनी एक हप्ता दिल्यानंतर त्याला किमान एक महिना तरी विजबिल भरण्याकरिता तगादा लावू नये, ग्राहकाने वापरलेल्या विजेचे शुल्क बिल ग्राहक भरण्यास तयार आहे मात्र कोरोनाचे पार्श्वभूमी असल्यामुळे दिलासा मिळावा या या मागण्या वंचितने केल्या आहेत. अन्यथा महाराष्ट्र शासनाच्या लक्ष वेधण्यासाठी एक दिवसीय ढोलकी वादन करून ठिय्या आंदोलन करणार आहेत. मागण्या जर महावितरण कंपनीने मान्य केले नाही तर सामूहिक आत्मदहन करण्यात येणार असल्याचा इशारा देखील सुधागड तालुका वंचित बहुजन आघाडीने दिला. यावेळी सुधागड अध्यक्ष अमित गायकवाड, जिल्हा सचिव नारायण जाधव, जिल्हा नेते मंगेश वाघमारे, तालुका सचिव आनंद जाधव, प्रशांत जाधव, राहुल गायकवाड, भागवत गायकवाड, गौतम गायकवाड, रमेश जाधव, वैभव जाधव, सागर यादव आदी पदाधिकारी उपस्थित होते.